प्रशासकीय मान्यता-
कुर्ला येथील न्यायालयीन इमारतीमध्ये उदवाहन स्थापित करणेबाबत.........

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः- सीसीबी-१११९/प्र.क्र.५५/का-१३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांकः- ०७ सप्टेंबर, २०१९

पहा :- १) मा.प्रबंधक (निरीक्षणे-२), मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई यांचे पत्र क्रमांक : बीडब्ल्यू-६०६२/१९८६(७९)/७४५/३१२, दिनांक ११ मार्च, २०१९
२) मा.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे पत्र क्रमांक ४६४६/२०१८, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८

प्रस्तावना-: उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये, कुर्ला, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीमध्ये उद्ववाहन स्थापित करणेबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून शासनास सादर करण्यात आला आहे. सदरहू प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -: कुर्ला, मुंबई येथील न्यायालयीन इमारतीमध्ये उद्ववाहन स्थापित करण्याकरीता रु.५४.८६ लक्ष (बांधकामाकरीता रु.२९.९४ लक्ष + विद्युतीकरणासाठी रु.२४.९२ लक्ष) (रुपये चोप्पन लाख शहाऐंशी हजार फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास (खाली नमूद केलेल्या विगतवारीनूसार या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	तपशिल	प्रशासकीय मान्यता
अ	**भाग-पहिला**	**रक्कम रुपयात**
१.	स्थापत्य काम	२१,२३,३५४.८५
२.	भाववाढ (२०%)	४,२४,६७०.९७
३.	विद्युतीकरण (५%)	१,०६,१६७.००
४.	आकस्मिकता निधी (४%)	८४,९३४.१९
५.	वस्तू-नि-सेवा कर (१२%)	२,५४,८०२.५८
	एकूण भाग पहिला (अ)	**२९,९३,९२९.५९**
	म्हणजेच एकूण रुपये (लाखात)	**२९.९४**
ब	**भाग दुसरा**	**रक्कम रुपयात**
१	नवीन उदवाहन	१८,५५,१२९.००
२	उदवाहनाकरीता विद्युतीकरण	१,२०,७१५.५०
३	आकस्मिकता निधी (४%)	७९,०३४.००
४	वस्तू-नि-सेवा कर (१२%)	२,४६,५८५.००
५	क्वालीटी कंट्रोल व टेस्टींग (५%)	१,१५,०७३.००
६	टी ॲन्ड पी चार्जेस (१%)	२४,१६५.००
७	बेस्ट ३ फेज कनेक्शन चार्जेस	५१,८४०.००
	एकूण भाग दुसरा (ब)	**२४,९२,५४२.००**
	म्हणजेच एकूण रुपये (लाखात)	**२४.९२**
	प्रकल्पाची एकूण किंमत अ+ब (रुपये लाखात)	**५४.८६**

२. ही प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क. १ दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) काम सुरू करण्यापुर्वी सर्व संबधीत स्थानिक संस्था /प्राधीकरणे यांची मान्यता घेण्यात यावी .

इ) सावर्जनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७ /प्र.क्र.६०/ इमारती-२, दि. ०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

३. या प्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र.एच-८, ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च-०१, कार्यालयीन इमारती-०५१,बांधकाम-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०३) न्यायदान (केंद्रपुरस्कृत योजना- राज्य हिस्सा), योजनांतर्गत, (०३) (०१) मोठी बांधकामे, ५३ मोठी बांधकामे (४०५९०६७२) व (२१) न्यायदान (केंद्रपुरस्कृत योजना- केंद्र हिस्सा), (२१) (०१) मोठी बांधकामे, ५३ मोठी बांधकामे (४०५९१२२२)" लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. मात्र, अर्थसंकल्पात तरतूद केल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये.

४. हे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:-३०६/ इमा-२, दि.०६.०७.२०१९ अनुसार त्या विभागाच्या सहमतीने आणि नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक ससामा-२०१०/प्र.क्र.४८(भाग-१),/का-१४६१, दिनांक ११ जून २०१८ अन्वये व वित्त विभाग शासन निर्णय क्र:-विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२ दि.१७ एप्रिल,२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र. १३४ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये संबंधित सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०७१६०३५३९२१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.09.07 16:09:18 +05'30'

(अमोघ श्या. कलोती)

विधि सल्लागार-नि-सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

२. मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

३. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

४. महाप्रबंधक, उच्च न्यायालय , मुंबई,

५. प्रबंधक, बी (डब्ल्यू) शाखा, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,

६. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.

७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-दोन, नागपूर,

८. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई

९. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई

१०. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी, मुंबई (मूळ अंदाजपत्रक व आराखडे यांच्यासह)

११. उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कुर्ला उपविभाग, मुंबई

१२. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई

१३. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

१४. वित्त विभाग/व्यय-५, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

१५. नियोजन विभाग,१४४३, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

१६. अपर आयुक्त व सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, १८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

१८. कक्ष अधिकारी, का.७, ११ व १२,विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

१९. निवड नस्ती/संग्रहार्थ.